# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) (द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/3895/२०२० दि. 5 /११/२०२०

## परीपत्रक

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील सर्व प्राचार्यांना व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०१९–२० मधील अंतिम वर्षातील/अंतिम सत्रातील विद्यार्थी व अशा विद्यार्थ्यांचे बॅकलॉग विषयांच्या उन्हाळी–२०२० च्या परीक्षा १२ऑक्टो. २०२० पासून घेण्यात आलेल्या आहेत.

उर्वरित सत्रातील ए.टी.के.टी विद्यार्थ्यांच्या उन्हाळी–२०२०च्या परीक्षा दि. २० नोव्हे. २०२० पासून घेण्याचे नियोजीत असुन अशा सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश पत्र व संबंधित परीक्षेचे वेळापत्रक महाविद्यालयांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगीन आयडीवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हया सर्व परीक्षा **Online MCQ** पध्दतीनेच होणार असुन सर्व विद्यार्थ्यांना याबाबत मा. प्राचार्यांनी आपल्या स्तरावर अवगत करून दयावे.

अंतिम वर्षातील जे विद्यार्थी उन्हाळी–२०२० परीक्षेकरिता वैध कारणामुळे परीक्षेपासून वंचित राहीलेले आहेत व महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांची यादी लवकरच विद्यापीठाद्वारे प्रकाशित करण्यात येईल व सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षा ए.टी.के.टी विद्यार्थ्यांच्या वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.

अंतिम वर्षातील/अंतिम सत्राच्या संपन्न झालेल्या उन्हाळी–२०२० परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा यथावकाश घेण्यात येईल, त्याबाबतचे परीपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

5/11/2020

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned by CamScanner